(61)
(14)
(158)

अधिसूचना

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २१ सप्टेंबर १९९९.

प्रक्र-
क्र.टि आर.एस. -१०९५/... ...-१०९/फ-६, भारतीय वन अधिनियम १९२७(१९२७ चा
सोळा) याच्या कलम ७६ च्या खंड (ड) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व याबाबतीत
महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि भारतीय वन (महाराष्ट्र
एकीकरण व सुधारणा ) अधिनियम, १९६०(१९६१ चा महाराष्ट्र सहा) याच कलम १७ व मुंबई वन
उत्पादनाचे वाहतूक (विदर्भ प्रदेश आणि सौराष्ट्र व कच्छ क्षेत्रे ) नियम, १९६० याच्या आधारे
अंमलात असण्याचे चालू असलेल्या हैद्राबाद वन उत्पादनाचे वाहतूक (मुंबई ) नियम, १९५८ चे
अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन, याद्वारे . मुंबई वन नियम, १९४२ मध्ये आणखी सुधारणा
करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :-

१. संक्षिप्त नाव :- या नियमाला मुंबई वन (सुधारणा) नियम, १९९९ असे म्हणावे.
२.नियम १ ची सुधारणा :- मुंबई वन नियम १९४२ च्या कलम १ मध्ये हस्तांतरीत प्रदेश
वगळून मुंबई राज्य या मजकुराऐवजी संपूर्ण महाराष्ट्र राज्य हा मजकूर दाखल करण्यात येईल.
३. व्यावृत्ती :- हैद्राबाद वन उत्पादन वाहतूक (मुंबई) नियम, १९५८ व मुंबई वन उत्पादन
वाहतूक (विदर्भ प्रदेश आणि सौराष्ट्र व कच्छ क्षेत्रे) नियम, १९६० यांचे अधिक्रमण केलेले असले तरी
ही अशा प्रकारे अधिक्रमण करण्यात आलेल्या उक्त नियमान्वये किंवा नियमांद्वारे करण्यात आलेली
कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (दिलेले निदेश, करण्यात आलेली प्राधिकार पत्रे ,चौकशा,
मालमत्तेची जप्ती , देण्यात आलेले मंजुरीचे अधिकार, देण्यात आलेली परवापने, परवानगी किंवा
निर्गमित केलेले वाहतूक परवाने व या नियमान्वये कोणत्याही अपराधासंदर्भात दिलेली शास्ती, शिक्षा
चालू असलेले कोणतेही अन्वेषण किंवा कायदेशीर कार्यवाही यांसह) मुंबई वन नियम, १९४२ च्या
संबंधित तरतुदींन्वये करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि मुंबई वन नियम, १९४२ अन्वये
करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही त्यांच्यात फेरफार किंवा सुधारणा करण्यात
येईपर्यंत तदनुसार अंमलात असण्याचे चालू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

सु. कु. खेतरपाल
डॉ. सु.कु.खेतरपाल
शासनाचे सह सचिव.